**सं.फौ.के.नं. २१९/२०२०**

**नि. क्र. ४१**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब इन कॅमेरापध्दतीने नोंदविणेत आला.**

नाव – सानवी सागर जाधव,

वय– २६ वर्षे, व्यवसाय – गृहीणी, रा. चाफवली सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. सध्या रा. मुंबई.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे –**

०१. दि. २९/१२/२०१९ रोजी माझा विवाह झाला. माझ्या पतीचे नाव सागर चंद्रकांत जाधव आहे. घरी माझे पती, त्यांची आत्या वेदीका विजय यादव, पतीच काका रमाकांत मारुती जाधव, पतीची काकी पल्लवी रमाकांत जाधव व पतीची आजी मालती मारुती जाधव असे आम्ही एकत्र राहतो. आम्ही चाफवली सरोदेवाडी येथे राहत असायचो.

०२. दि. २९/०७/२०२० रोजी माझी तब्येत बरी नसल्याने मी माझे माहेर वडवली, ता. राजापुर येथे गेले होते. माझ्या सोबत माझे पती देखील होते. माझी तब्येत बरी झाल्यानंतर दि. ०१/०८/२०२० रोजी आम्ही पुन्हा रात्री पावणे आठच्या सुमारास चाफवली सरोदेवाडी येथे आलो. आम्ही राहत्या घराच्या खोलीचे कुलुप उघडुन आत गेलो. आम्ही घरात गेल्यावर खोलीची साफसफाई केली. साफसफाई करुन झाल्यानंतर माझ्या पतीने बसण्यासाठी सुटकेस वरुन चटई काढली. त्यावेळी चटईतून काहीतरी खाली पडल्याचा आवाज आला. आम्ही काय पडले पाहीले असता तिथे एक डबी आम्हाला सापडली. माझ्या पतीने ती डबी उघडली असता त्यात सोन्याचे दागीने आम्हाला मिळून आले. त्यानी मला हे दागीने

माझे आहेत का, किंवा मी ठेवले आहेत का असे विचारले. मी त्यांना ते दागीने माझे नसल्याचे व ते मी ठेवलेही नसल्याचे सांगीतले. त्यानंतर माझ्या पतीने पोलिस पाटलांना फोन केला व घडलेली घटना सांगीतली. त्यांनी मला दागीने आहेत तसेच ठेवायला सांगीतले. म्हणून मी तसेच ठेवले.

०३. दुस–या दिवशी दि. ०२/०८/२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजता पोलीस पाटील आमच्या घरी आले. पोलिस पाटील घरी आल्यानंतर आम्ही ते दागीने समोर आणले. त्यांनी दागीने कोणाचे आहेत अशी विचारणा केली. त्यावेळी माझ्या पतीची आजी हीने ते दागीने तीचे व तीच्या पतीचे असल्याचे सांगीतले. त्यावेळी पतीची मोठी आत्या सुरेखा राजेंद्र यादव आमच्या राहत्या घरी आल्या व त्या आम्हाला, 'आमचे दागीने अजून चोरले आहेत' असे म्हणू लागल्या.

०४. त्यावेळी घरात पतीची आत्या वेदीका यादव, स्वाती यादव, पतीचे काका रमांकांत जाधव, पल्लवी जाधव, मालती जाधव, घरात हजर होत्या. पोलिस पाटलांनी त्यांना सांगीतले की, आणखी दागीने चोरीला गेले असल्यास त्याचा तपास पोलीस करतील. सबब आम्ही दागीने घेऊन देवरुख पोलीस स्टेशनला आलो. त्याच दिवशी सकाळी ०९.३० च्या सुमारास पोलिस पाटील गेल्यानंतर माझ्या पतीची काकी पल्लवी जाधव हीने आम्हाला 'तुंम्ही चोर आहात' असे बोलुन शिवीगाळ केली. पतीची अात्या वेदीका यादव हीने मला, 'तुंम्ही वेश्या आहात, साक्षीदाराने पुन्हा एकदा सांगीतले की, त्या म्हणाल्या की, 'तु वेश्या आहेस, तूला दोन तीनशे रुपये दिले तर खुश होतेस'. माझ्या पतीचे काका रमांकांत जाधव असे म्हणाले की, 'तुला एवढीच पैशाची गरज असेल तर, तु माझ्या शेजारी झोप'. पतीच्या वाडीत राहणारी आत्या स्वाती राजेंद्र यादव हीने मला शीवीगाळ करायला सुरुवात केली. हे ऐकल्यानंतर माझ्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे गैरकृत्य केले. सबब मी यांच्या विरुध्द देवरुख पोलिस ठाण्यात तक्रार दिली. साक्षीदारांना आता दि.

०२/०८/२०२० ची फिर्याद दाखवण्यात आली. ही तीच फिर्याद आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.४२** देण्यात येते.

०५. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत. मी यांच्याच बाबतीत न्यायालयात तक्रार दिलेली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांचेतर्फे** –

०६. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीचे वडील त्यांच्या लहानपणीच मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या पश्चात माझ्या पतीची आई हीने माझे दीर यांचा सांभाळ केला व माझे पती यांचा सांभाळ आजी, आजोबा व आत्या वेदीका यादव यांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, अगदी लहान वायातच माझ्या पतीचा सांभाळ त्यांच्या आजी, आजोबा व आत्यांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे पती व त्यांच्या बहीणीचा सांभाळ देखील त्यांनीच केला.

०७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीची आई चाफवलीच्या घरात येत नसे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, माझे पती पाच ते सहा वर्षाचे असल्यापासून त्या माझ्या पतीला सोडून गेलेल्या आहेत. माझ्या पतीचे वय वर्षे २९ आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते पाच ते सहा वर्षा नंतरचा ते लग्न होईपर्यंतचा माझ्या पतीचा पुर्ण खर्च त्यांच्या वडीलांच्या बाजूकडील लोकांनी केला. माझ्या म्हणण्याप्रमाणे तो खर्च माझ्या पतीच्या आजी आजोबांनी केला. मला माझ्या पतीचे आजोबा कधी मयत झाले माहीती नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न होईपर्यत माझी नणंद व माझे पती चाफवलीच्याच घरात रहायचे. हे म्हणणे खरे आहे की, रमांकात जाधव आरोपी क्र.१

माझे चुलत सासरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ माझी चुलत सासू, आरोपी क्र.३ व ४ माझ्या पतीच्या आत्या आहेत.

०९. हे म्हणणे खरे आहे की, आमचा प्रेम विवाह झाला. माझा विवाह खानु मठ येथे झाला. हे म्हणणे खरे आहे की, विवाहाला माझ्या माहेरची मंडळी उपस्थीत नव्हती. त्यावेळी लग्नाला पतीची आजी, पतीचे काका शशीकांत जाधव, पतीची काकी शशिकांत जाधव यांची पत्नी, त्यांची दोन मुले, माझ्या नंदेचे दिर, नंदेची सासू, नंदेची जाऊ, उपस्थीत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लग्नाला उपस्थीत नव्हते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापुर्वी देखील मी चाफवलीच्या घरात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ मध्ये मी माझ्या पतीच्या घरात येऊन राहायचे. याची मला कल्पना नाही की, तेव्हा आरोपी क्र. १ ने पोलिस पाटलांकडे अर्ज देवुन, मी विवाहापुर्वी त्यांच्या घरी राहत असल्याबाबत मला समज देणेत यावी असा अर्ज दिला होता. माझ्या मुलाची जन्मतारीख १७/०७/२०२३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर आम्ही मुंबईत स्थायिक झालो.

११. याची मला माहीती नाही दि. २९/०६/२०१९ रोजी माझे पती व आरोपी क्र.४ विरुध्द काही तक्रारी अर्ज झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ ने याच न्यायालयात मी, माझे पती, व पतीचे काका शशीकांत यांच्या विरुध्द देवरुख न्यायालयात नि.फौ.खटला क्र. ०३/२०२१ दाखल केलेला आहे व तो सध्या प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये मी वर नमुद केल्याप्रमाणे तथाकथीत डबी व त्यातील सोने चोरल्याचे आमच्यावर आरोप आहेत.

१२. हे म्हणणे खरे आहे की, नि.फौ.खटला क्र. ०३/२०२१ मधील घटनेची तारीख ही या केसमधील तारखे सारखीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत सरतपासात म्हटल्याप्रमाणे आंम्ही गावी जाताना व माघारी आल्यावर दोन्ही वेळेस माझ्या पतीनेच कुलुप लावले व उघडले. हे म्हणणे खरे आहे की,

गावातील पोलीस पाटलांचे नाव विजय चाळके आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने पोलिस पाटलांना कधी फोन केला याची कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे चाफवली येथील घर एकाच आड्याखाली स्वतंत्र खोल्यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, या घरात मालती जाधव, रमाकांत जाधव, शशिकांत जाधव, सागर जाधव, वेदीका यादव यांच्या स्वतंत्र खोल्या आहेत.

१३. दि. ०१/०८/२०२० रोजी माझ्या पतीची आजी मालती जाधव आम्ही आलो त्यावेळी घरात होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/०८/२०२० रोजी त्यांना सोन्याची दागीने असलेल्या डबीबाबत काही सांगीतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलिस स्टेशनला देखील याबाबत कळवले नव्हते. हे मला माहीती नव्हते की, त्या डबीतले दागीने माझ्या पतीची आजी मालती जाधव हीचे होते.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळेस माझ्या सोबत माझे पती, त्यांचे चुलते, पोलीस पाटील हजर होते. दि. ०२/०८/२०२० रोजी आम्ही सकाळी ११.०० वाजता देवरुख पोलीस स्टेशनला आलो तेव्हापासून तिथेच होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलिस स्टेशनला गेलो असता तेथे माझ्या पतीची आजी व सर्व आरोपी देखील उपस्थीत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये माझ्या पतीचे चुलते व त्यांनी पत्नी देखील हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांना दि. ०२/०८/२०२० च्या घटनेबाबत कल्पना दिली व नंतर मी फिर्याद दाखल केली.

१५. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देण्याकरता पोलिस स्टेशनला आले असता मला ही माहीती मिळाली होती की, आरोपी क्र.३ देखील डबीतील सोन्याच्या चोरीबाबत फिर्याद देण्याकरता पोलिस स्टेशनला आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सोने माझ्या पतीने पोलिस स्टेशनकडे सुपुर्त केले. हे म्हणणे खरे नाही

की, त्या ठिकाणी सोने जमा करताना पंचनामा पार पडला. आम्ही पाच ते सात तास देवरुख पोलिस स्टेशनला होतो.

१६. हे म्हणणे खरे आहे की, शशीकांत जाधव संध्याकाळी ०४.०० ते ०५.०० च्या दरम्याने देवरुख पोलिस स्टेशनला हजर होते. मला फिर्याद कोणी टाईप केली त्यांचे नाव सांगता येणार नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की, सध्या आरोपी क्र.४ रत्नागिरी येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ चे चाफवली येथे स्व्तंत्र घर असून ती तिथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ प्राथमिक शिक्षीका आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ रत्नागिरी येथे त्यांच्या कुटुंबासह राहतात. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यांचे अधुन मधुन चाफवली येथे येणे जाणे असते.

१८. हे मला माहीती नाही की, मालती जाधव यांचे दागीने आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.४ कडे सुटकेसमध्ये ठेवण्याकरता दिले होते. हे मला माहीती नाही की, आरोपी क्र.३ चे असे म्हणणे होते की, त्या दागीन्यांमध्ये मालती जाधव सोबत त्यांचे देखील दागीने सुटकेसमध्ये ठेवलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ ने सागीतले की, चोरीच्या घटनेच्या दिवशी त्यांना सुटकेसमध्ये केवळ त्यांचेच स्वतःचे दागीने मिळून आले, मालती जाधव यांचे दागीने मिळून आले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तेच दागीने दि. ०१/०८/२०२० रोजी आमच्या खोलीत सापडून आले होते.

१९. हे म्हणणे खरे आहे की, त्या दागीन्यांमध्ये एक सोन्याचे नेकलेस, एक सोन्याचा गोफ व वाघनख पेन्डंट, तीन अंगठ्या व एक बांगडी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यात महत्वाची कागदपत्रे देखील होती.

२०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ जी चोरीची केस दाखल करेल त्यातुन सुटण्यासाठी ही खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आज

साक्ष काय द्यायची याबाबत माहीती घेतली व साक्ष दिली. माझी फिर्याद पोलीसांनी माझ्याच सांगण्यानुसार नोंदवली होती. माझ्या सरतपासातील मजकुर की, पोलिस पाटील यांनी दागीने कोणाचे आहेत अशी विचारणा केली, हा मी पोलिसांना फिर्यादी जबाब देतेवेळी सांगीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो मजकुर माझ्या फिर्यादीत नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

२१. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ व माझ्या पतीचे दुसरे चुलते शशीकांत यांची एकमेकांशी बोलाचाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० पासून माझ्या पतीची देखील आरोपी क्र. १ शी बोलाचाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० पासून माझी देखील आरोपी क्र. १ ते ४ यांच्याशी बोलाचाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० पासून आमच्या चाफवलीच्या खोलीमध्ये आरोपी क्र. १ ते ४ येत जात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, चाफवली येथील घराच्या आजूबाजूला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मालती जाधव, शशीकांत जाधव, शामल जाधव, सागर जाधव हे साक्षीदार माझे नातेवाईक आहेत.

२२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने माझ्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असा कोणताही प्रकार कधी केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ते ४ यांनी देखील माझ्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असा प्रकार, शीवीगाळ मला कधी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.फौ.खटला क्र. ०३/२०२१ मधून निर्दोष मुक्तता होण्याकरता या आरोपींविरुध्द मी खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

सही/–

(श्रीमती  एस.एच.पाटील)

दिनांक – १२/०२/२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.